विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय

मोर्शी रोड, अमरावती- ४४४६०२

नॅकद्वारा B+ श्रेणीने मानांकीत
CGPA 2.63

## कनिष्ठ, वरीष्ठ व
## + २ व्यावसायिक अभ्यासक्रम

# महाविद्यालयीन आचारसंहिता

Email : imc.amt@gmail.com
Website : www.immmv.org

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय

मोर्शी रोड, अमरावती.

(B+ श्रेणीने पूनर्मानांकित CGPA 2.63)

# महाविद्यालयीन आचारसंहिता

## वरीष्ठ-कनिष्ठ कला विभाग व
## + २ स्तरावरील
## व्यावसायिक अभ्यासक्रम

❊ प्रकाशक ❊

प्राचार्य

इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय

मोर्शी रोड, अमरावती.

फोन नं. (०७२१) २०२०६०१, फॅक्स नं. (०७२१)-२६६४२७२

प्रकाशन - दि. २६ जानेवारी २०१९

# नियमित व बाह्य विद्यार्थ्यांकरिता आचार संहिता

## (As per clause 95)

विद्यार्थिनींनी वर्ग खोली, प्रयोगशाळा व महाविद्यालय परिसरांमधील शिस्तीचे काटेकोर पालन करावे. ह्यासोबतच महाविद्यालयाद्वारे आयोजित केलेले दौरे, सहल आणि शैक्षणिक सहली दरम्यानही शिस्त पाळावी.

विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संस्थेच्या कामकाजात अडथळा आणणारी कोणतीही कृती करू नये.

विद्यापीठाने ठरविलेल्या सर्व व्याख्यानांमध्ये आणि प्रॅक्टीकलमध्ये विद्यार्थिनी उपस्थित राहू शकतील.

ज्या विद्यार्थिनींकडुन आचार संहितेच्या विरूद्ध कृती केल्याचे आढळेल अशां विरूद्ध प्राचार्यांच्या वतीने सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या अधिसुचनेत नमुद केल्याप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही केल्या जाईल.

## अनुशासनहिन वर्तन :-

खालील वर्तन अनुशासनहिन वर्तणूक म्हणून ग्राह्य धरून त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

१) बनावट कागदपत्रे वापरून किंवा तथ्य दडपशाही करून कोणत्याही स्नातक आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश मिळवणे.

२) महाविद्यालयीन परिसरामध्ये मागणीनुसार संस्थेने दिलेले ओळखपत्र तयार करण्यास नकार देणे.

३) कोणत्याही विद्यार्थिनीस शैक्षणिक अभ्यासपूरक, सांस्कृतिक किंवा विस्तार उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी अडथळा आणणे.

४) महाविद्यालयीन परिसरामध्ये धुम्रपान उत्पादने आणि दारू बाळगणे किंवा विक्री करणे, वितरण किंवा सेवन करणे.

५) प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय महाविद्यालयीन परिसरात ऑडिओ, व्हिडीओ क्लिप्स रेकॉर्डिंग करणे संस्थेशी संबंधित अपमानास्पद टिप्पणी सोशल मिडीयावर देणे व पोस्ट करणे.

६) कोणतेही प्राणघातक शस्त्रे किंवा स्फोटके असणे किंवा वापरणे.

७) कोणतेही मादक रसायने आणि ड्रग्ज असणे त्यांचे सेवन करणे किंवा त्यांचे वितरण करणे.

८) रॅगिंग, लैंगिक छळ तसेच हिंसाचाराच्या कोणत्याही कृत्यास महाविद्यालयीन परिसरात भाग पाडणे.

९) कोणतीही हिंसा भडकविणे त्यामध्ये भाग घेणे, हिंसक निदर्शने, आंदोलन किंवा हिंसक संप आयोजित करणे.

१०) कोणत्याही घेरावाला भडकविणे, त्यात भाग घेणे किंवा शिक्षक सदस्य किंवा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याविरूद्ध हिंसक आंदोलन करणे.

११) संस्थेची कोणतीही मालमत्ता, कागदपत्रे किंवा रेकॉर्ड चोरी करणे किंवा हानी पोहोचविणे.

१२) जुगार क्रिया कलाप आयोजित करणे किंवा सहभागी होणे.

१३) संस्थेच्या किंवा प्राचार्यांच्या लेखी परवानगी शिवाय कोणत्याही, धर्मदाय, सामाजिक, धार्मिक किंवा राजकीय कारणांसाठी निधी गोळा करणे किंवा वाढविणे.

१४) राष्ट्रीय आपात्कालीन परिस्थिती, दंगली आणि राष्ट्रीय आपत्तीच्या काळात अफवा पसरविणे, निर्लज्ज वर्तन करणे.

१५) कोणत्याही देशविरोधी कार्यात भाग घेणे किंवा देशविरोधी घटकांना जाणून बुजून मदत देणे.

१६) भारतीय दंडसंहिता, भारतीय प्रक्रियात्मक संहिता किंवा भारत आणि इतर राज्य प्राधिकरणांच्या संघटनेद्वारे लागू केलेल्या सर्व कायद्यानुसार असलेल्या कार्यामध्ये भाग घेणे.

## नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा :

प्राचार्य किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त केलेले अधिकारी हे गैरवर्तन दोषी ठरलेल्या विद्यार्थ्यांस एक किंवा अधिक शिक्षा देवू शकतात.मानवी हक्कांच्या संरक्षणाखाली उपलब्ध असलेल्या कोणत्याही अधिकारांचा पुर्वग्रह ठेवणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

१) संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती, बक्षिस किंवा पदक नाकारणे.

२) तिला एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी महाविद्यालयीन परिक्षेस येण्यास मनाई करणे.

३) पाच वर्षापर्यंत महाविद्यालयातून काढून टाकणे.

# शिक्षकांकरिता आचारसंहिता

(Governemtn Resolution No. Misc. 2018/C.R.56/18/UNI-I)

१) शिक्षकांनी वेळापत्रकानुसार तासिकांची तयारी करून तासिका घ्याव्या.

२) विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षमता व शैक्षणिक गरजा विचारात घेऊन गटवार विभागणी करावी.

३) शिक्षकांवर सोपविलेल्या विद्यार्थी किंवा विद्यार्थी समुहाला अध्ययनाकरिता प्रोत्साहन द्यावे.

४) विद्यार्थ्यांकडुन कोणत्याही प्रकारचे बक्षिस किंवा मोबदला न घेता सहकार्य करावे.

५) विद्यार्थीनींना त्यांनी घेतलेल्या विषयांच्या अध्ययना संदर्भात आवश्यक असलेली माहिती द्यावी.

६) विद्यार्थिनींच्या खाजगी घडामोडी आपल्या व्यवसायाच्या सन्मानांशी सुसंगत ठेवाव्या.

७) संस्थेचे वेळोवेळी आयोजित केलेल्या संबंधित सभेमध्ये भाग घ्यावा.

८) सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाने ठरविलेल्या अभ्यासाचे, अध्यापनाचे कार्यक्रम, अध्यापनाच्या पद्धती आणि मुल्यांकन तसेच अभ्यास कर्माची तयारी व विकास करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख व इतर प्राध्यापकांना सहकार्य करावे.

९) विद्यार्थिनींमध्ये चांगली शिस्त व सुव्यवस्था राखावी तसेच महाविद्यालयीन परिसरामध्ये त्यांच्या सुरक्षिततेकडे लक्ष पुरवावे.

१०) संस्थेच्या योग्य नियोजन व प्रशासनासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या सभा व इतर सभांमध्ये सहभागी व्हावे.

११) समुदाय सेवेसह विस्तार, अभ्यासक्रम आणि अतिरिक्त अभ्यासक्रमांमध्ये

भाग घ्यावा.

१२) संस्थेच्या योग्य व्यवस्थापनेच्या दृष्टीने शिस्त यामध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही अडचणींना शक्यतोवर वाजवी मार्गाने सोडवावे.

१३) यु.जी.सी. प्रायोजित अॅकेडेमिक स्टॉफ कॉलेजने विहित केलेल्या उजळणी वर्ग, सेवा अंतर्गत प्रशिक्षण, अभ्यासक्रम व वैयक्तिक प्रशिक्षणांमध्ये भाग घेऊन व्यावसायिक विकास साधावा.

१४) आपले मतं व्यक्त करतांना विद्यार्थ्यांच्या अधिकाराचा आणि सन्मानाचा आदर करावाव.

१५) विद्यार्थीनींसह इतर सर्वांचा त्यांच्या जात, धर्म, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि शारीरिक वैशिष्ट्ये विचारात न घेता. प्रामाणिकपणे आणि नि:पक्षपातीपणे व्यवहार करावा.

१६) विद्यार्थ्यांमधील योग्यता आणि क्षमतांमधील फरक ओळखुन त्यांच्या वैयक्तिक गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करावा.

१७) विद्यार्थिनींना त्यांची प्रगती सुधारण्यासाठी प्रोत्साहित करून त्यांची व्यक्तीमत्व विकसित करावे.

१८) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन आणि शारीरिक श्रमाबद्दल आदर आणि लोकशाही विषयी आदर तसेच देशप्रेम ही मुल्ये रूजविण्यास मदत करावी.

१९) विद्यार्थीनींमध्ये राष्ट्रीय वारसा, त्यांची वैशिष्ट्ये, समजुन घेऊन ती विकसित करण्यास मदत करणे.

२०) इतर विद्यार्थीनी, सहकारी आणि प्रशासनविरूद्ध विद्यार्थीनींना भडकावण्यापासुन परावृत्त करणे.

# व्यावसायिक नितीतत्वांचे नियम

## शिक्षक आणि त्यांचे उत्तरदायित्व :

जो कोणी शिक्षक हा व्यवसाय स्विकारतो तो हेही बंधन स्विकारतो कि त्याने/तिने त्या व्यवसायाच्या आदर्शतत्वांनुसार वर्तणूक ठेवावी. शिक्षक हा सतत त्याच्या विद्यार्थ्यांच्या आणि विस्तृत समाजाच्या निगराणीखाली असतो. म्हणूनच प्रत्येक शिक्षकाने त्याचे नितीपर उपदेश व कृती यामध्ये विसंगती असू नये याकडे लक्ष द्यावे. यापुर्वीच अंगीकारलेले शिक्षणाचे राष्ट्रीय आदर्श, जे तो/ती विद्यार्थ्यांच्या अंगी बनवू इच्छितो, ते त्याचे/तिचे स्वतःचे आदर्श असावेत. या व्यवसायाची गरज आहे कि शिक्षक हा वृत्तीने शांत, संयमी, संवादकुशल तसेच मनमोकळ्या स्वभावाचा असावा.

१) समाजाला त्याच्याकडून अपेक्षित असणारे आचरण व जबाबदारीपूर्ण वर्तणूकीची पद्धत यांचेशी समर्पित रहावे.

२) व्यवसायाच्या प्रतिष्ठेस अनुरूप पद्धतीने त्याने त्याच्या खाजगी बाबींचे व्यवस्थापन करावे.

३) अभ्यास आणि संशोधन याद्वारे निरंतर व्यावसायिक विकास करण्यास प्रत्यनशील असावे.

४) ज्ञान संवर्धनातील हातभारासाठी व्यावसायिक बैठका परिसंवाद, परिषद इत्यादी मधील सहभागाद्वारे स्पष्ट भूमिका व्यक्त करावी.

५) व्यावसायिक संघटनांचे कृतीशिल सदस्यत्व धारण करून त्याद्वारे शिक्षण व व्यवसाय यात सुधारणा करावी.

६) अध्यापन, मार्गदर्शन, प्रात्यक्षिक, परिसंवाद व संशोधन यासारख्या स्वरूपातील कर्तव्य सदसदविवेक बुद्धीने व समर्पितपणे पार पाडावे.

७) अध्यापन व संशोधन यातील वाङमयचौर्य व इतर नितीतत्व विहिन आचरणात रममाण न होता त्यापासुन स्वतःला परावृत्त करावे.

८) विद्यापीठाचे कायदा (Act), परिनियम (Statute) व अधिनियम (Ordinance) स्वीकृत करून त्यांची तत्वे भूमिका, ध्येय व सांस्कृतिक परंपरा व आचरण यांचा सन्मान करावा.

९) प्रवेश अर्जाचे मूल्यांकन, विद्यार्थ्यांना सल्ला व समुपदेशन तसेच देखरेख, पर्यवेक्षण व मूल्यांकनासह महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षासाठी सहकार्य यासारख्या शैक्षणिक जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यात सहकार्य करून मदत करावी.

१०) समाजसेवेसह विस्तारीत अभ्यासक्रमाअंतर्गत तसेच अभ्यासेत्तर कार्यक्रमामधून सहभाग घ्यावा.

## शिक्षक आणि विद्यार्थी

१) त्याने/तिने आपले विचार व्यक्त करतांना विद्यार्थ्यांचे हक्क व प्रतिष्ठा यांचा सन्मान करावा.

२) धर्म, जात, लिंग, राजकीय, आर्थिक, सामाजिक व शारीरिक गुणवैशिष्ट्ये लक्षात न घेता विद्यार्थ्यांशी भेदभावरहित व न्याय्य वर्तणूक ठेवावी.

३) विद्यार्थ्यांमधील कला व क्षमता यांचा फरक ओळखून त्याच्या वैयक्तिक गरजांची पूर्तता करण्यासाठी झटावे.

४) विद्यार्थ्यांना त्यांच्या उपलब्धी संवर्धनासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी प्रेरित करावे व त्याचवेळी सामाजिक कल्याणासाठी सहभागी व्हावे.

५) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक वृत्ती, जिज्ञासा, लोकशाही तत्वे राष्ट्रभक्ती, सामाजिक न्याय, पर्यावरण रक्षण, शांती ही तत्वे रूजवावी.

६) विद्यार्थ्यांना प्रतिष्ठेची वागणुक देऊन त्यांचेपैकी कुणाशीही कुठल्याही कारणासाठी सूडभावनेने वागू नये.

७) गुणवत्ता मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपलब्धीकडे लक्ष द्यावे.

८) वर्गतासिका व्यतिरिक्त इतर वेळी तरीही स्वतः विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध रहावे व कुठल्याही बक्षिस अथवा मानधनाशिवाय त्यांना मार्गदर्शन व मदत करावी.

९) आपले राष्ट्रीय वारसा व उद्दिष्टे यांची उमज विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांना सहकार्य करावे.

१०) विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थी, सहकारी व प्रशासना विरूद्ध उकसावण्यापासून परावृत्त करावे.

## शिक्षक आणि सहकारी

१) व्यवसायातील इतर सदस्यांशी तशीच वर्तणूक ठेवावी जशी इतरांनी आपल्यास वागवावे असे वाटते.

२) इतर शिक्षकांबद्दल सन्मानपूर्वक बोलावे व व्यावसायिक भल्यासाठी सहकार्यासाठी पुढे यावे.

३) सहकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्या विरूद्ध पूरावा नसणारे आरोप लावण्यापासून स्वतःला दुर ठेवावे.

४) व्यावसायिक प्रयासांमध्ये जात, पंथ, धर्म, वंश, लिंग या संबंधीच्या विचारांपासुन स्वतःला दूर ठेवावे.

## शिक्षक आणि अधिकारी

१) प्रचलित नियमांनुसार त्यांच्या व्यावसायिक जबाबदारीचे निर्वाहन करावे आपल्या संस्था, मंडळाच्या किंवा व्यावसायिक संघटनांद्वारे व्यावसायिक हितासाठी हानिकारक नियमांना बदलण्यासाठी पाउले टाकतांना त्यांच्या व्यवसायानुकुल प्रक्रिया व पद्धतींशी बांधिलकी ठेवावी.

२) ज्यामुळे त्यांच्या व्यावसायिक उत्तरदायित्वामध्ये अडचण निर्माण होतील अशा खाजगी शिकवणी न शिकवणी वर्ग यासह इतर रोजगार व बांधिलकी स्विकारण्यापासून परावृत्त रहावे.

३) संस्थेचे धोरण ठरविण्यासाठी विविध कार्यभार स्विकारून व अशा अधिकार क्षेत्राच्या मागणीनुसार उत्तरदायित्व पार पाडून सहकार्य करावे.

४) त्यांच्या संघटनांद्वारे इतर संस्थांचे धोरणे ठरविणे व कार्यभार स्विकारून सहकार्य करावे.

५) व्यवसायाच्या सन्मानावर आधारित व्यावसायिक हित लक्षात घेऊन संस्थेच्या भल्यासाठी अधिकाऱ्यांना सहकार्य करावे.

६) करारातील शर्तींशी बांधील रहावे.

७) पदांमधील बदल होण्यापुर्वी सुचना देणे व अपेक्षा करणे.

८) शैक्षणिक कार्यक्रम पूर्ण होण्याच्या दृष्टीने त्यांची विशिष्ट जबाबदारी लक्षात घेता, न टाळता येणाऱ्या कारणासाठी तेली शक्यतो पूर्वपरवानगी घेऊन या व्यतिरिक्त स्वतःसाठी तुटी घेण्यापासून परावृत्त रहावे.

## शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग

१) प्रत्येक शिक्षकाने संस्थेअंतर्गत सहकारी अंगीकृत कार्यात सहकार्य करावे

२) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अंतर्भाव असणाऱ्या संयुक्त कर्मचारी मंडळाच्या कार्यान्वयामध्ये सहकार्य करेल.

## शिक्षक आणि पालक

शिक्षक मंडळ व संघटनाद्वारे शिक्षण संस्थेने पालक व विद्यार्थी यांचेशी संपर्क साधून त्यांच्या उपलब्धीबद्दलचा अहवाल पालकास पाठवावा व जेव्हा आवश्यक असेल तेव्हा संस्थेच्या भल्यासाठी आपसी विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी बोलविलेल्या बैठकामध्ये पालकास भेटावे.

## शिक्षक आणि समाज

१) शिक्षण ही सामाजिक सेवा आहे हे ध्यानात घेऊन सादर केल्या गेलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांबद्दल लोकांना अवगत करावे.

२) समाजातील शिक्षण तसेच समाजाचे नैतिक व बौद्धीक जीवन उंचावण्याकरिता काम करावे.

३) समाजातील समस्यांची जाण ठेवून समाजाच्या म्हणूनच देशाच्या विकासाकरिता हितकारक अशा उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा.

४) सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होवून व जनसेवेची जबाबदारी स्विकारून नागरिक म्हणुन कर्तव्य पार पाडावे.

५) विविध जमाती, धर्म, भाषिक समुहामध्ये तिरस्काराची भावना अथवा शत्रुत्व वाढीव लावणाऱ्या कुठल्याही उपक्रमास सहकार्य करणे, सहमत होणे वा सहभागी होण्यापासुन दूर राहून राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करावे.

## महाविद्यालयाचे प्राचार्य

१) धोरण तयार करणे, अंमलबजावणीचे व्यवस्थापन, मानव संसाधनांचे संघटन,पर्यावरण विषयक जागृकता व जोपासना याद्वारे प्रेरणादायी व प्रभावी मुल्याधारित व कार्यप्रवण नेतृत्व प्रदान करावे.

२) त्याने/ तिने पारदर्शक न्याय प्रामाणिक उच्च नितिमूल्य व निर्णयाद्वारे महाविद्यालयाच्या हितासाठी कार्य करावे.

३) उच्चप्रतिची, परिणामकारक व कौशल्यपूर्वक स्त्रोतांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडून कामासाठी व अध्ययनासाठी उपयुक्त वातावरण तयार करून महाविद्यालयाच्या संपदेच्या देखभालीसाठी कार्य करावे.

४) समाजाद्वारे अपेक्षित सन्मानजनक व जबाबदारीपूर्ण पद्धतीच्या वागणुकीला बांधिल रहावे.

५) व्यवसायाच्या गौरवाशी सुसंगत अशा पद्धतीने आपल्या खाजगी बाबींचे व्यवस्थापन करावे.

६) अध्यापन व संशोधन यामध्ये नितीतत्व विहिन वर्तणूक व वाड्मयचौर्य यामध्ये लिप्त न होता परावृत्त रहावे.

७) समाजसेवेसह विस्तार, अभ्यासकेंद्री व अभ्यासेत्तर उपक्रमामध्ये सहभाग घ्यावा.

८) जात, पंथ, धर्म, वंश, लिंग या सारख्या समजुतींच्या बाबींचा प्रभाव त्याच्या व्यावसायिक कामावर होऊ देणे टाळावे.

## क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल

१) समाजाकडून अपेक्षीत अशा गौरवपूर्ण व जबाबदार वर्तणुक पद्धतीने वागण्यास कटीबद्ध असावे.

२) व्यावसायिक प्रतिष्ठेला अनुरूप पद्धतीने त्यांनी आपले खाजगी बाबींचे व्यवस्थापन करावे.

३) अध्यापन व संशोधन यात नितीतत्वविहित आचरण व वाङ्मयचौर्य यामधील सहभागापासून स्वतःला परावृत्त करणे व सहभागी न होणे.

४) समाजसेवेसह, विस्तार, अभ्यासकेंद्री व अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा.

५) जात, पंथ, धर्म, वंश, लिंग या आधारित समजुतींचा प्रभाव व्यावसायिक कार्यकलापावर पडू देण्यासपासुन परावृत्त रहावे.

********

प्रकाशक : प्राचार्य, इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती

(Pragati,Amt.9422236623)